# पहिल्या फ्लुएंट सीएफडी परिषदेत नामवंत सहभागी

**पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) :** फ्लुएंट इंडिया कंपनीतर्फे आयोजित कॉम्प्युटेशनल फ्लुइड डायनॅमिक्स (सीएफडी) विषयावरील तीन दिवसांची परिषद आजपासून येथे सुरू झाली.

या परिषदेचे उद्‌घाटन जनरल इलेक्ट्रिक - इंडिया कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दामोदर पदी यांच्या हस्ते झाले. परिषदेत सहभागी प्रतिनिधींचे स्वागत 'फ्लुएंट इंडिया'चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मुरली एन. कदीरमंगलम यांनी केले.

या परिषदेत भेल, जनरल इलेक्ट्रिक, एचसीएल, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, इन्फोसिस, किर्लोस्कर कोपलँड, एनटीसीपी, रिलायन्स, टाटा स्टील, टीसीएम, टेक्निप केटीआय अशा आघाडीच्या कंपन्या, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीज (आयआयटी) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (बंगलोर), यूआयसीटी (मुंबई) अशा नामवंत संस्था आणि नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (एनसीएल), डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (डीआरडीओ) व रिजनल रिसर्च लॅबोरेटरी (आरआरएल) अशा प्रयोगशाळा सहभागी झाल्या आहेत.

कॉम्प्युटेशनल फ्ल्युईड डायनॉमिक्समधील सध्याचे प्रवाह व भारतात या क्षेत्राला असणाऱ्या भविष्यातील संधी याबाबत या सर्व संस्था आपला दृष्टिकोन स्पष्ट करणार आहेत. 'सीएफडी'मुळे जगभरातील अभियांत्रिकी संस्थांना डिझाईन सायकल कमी करून प्रारूप खर्चात बचत करण्यास मदत झालेली आहे. 'सीएफडी' चा उपयोग एरोस्पेस, उपकरणे, वाहननिर्मिती, रसायने, ग्राहकोपयोगी उत्पादने, पर्यावरण, सागरी उद्योग, तेल व वायू, पॉलिमर प्रक्रिया, ऊर्जा मिनरल्स व मटेरियल्स अशा विविध उद्योगक्षेत्रांना कसा महत्त्वपूर्ण ठरतो, हे या परिषदेत मांडले जाणार आहे.

या संदर्भात फ्लुएंट इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मुरली एन. कदीरमंगलम म्हणाले, ''जागतिक स्पर्धेमध्ये 'सीएफडी'चे महत्त्व भारतीय उद्योगांनी ओळखले आहे. भारतीय बाजारपेठेत या स्पर्धेमुळे वेगवान प्रगती झाली आहे. 'सीएफडी'मुळे उद्योग, विद्यार्थी, विद्वान या साऱ्यांना देशासाठी महत्त्वपूर्ण क्षेत्रे विकसित करण्याची संधी निर्माण झाली आहे.

सीएफडी परिषदेमुळे शिक्षणक्षेत्र व उद्योगातील तंत्रज्ञ व वैज्ञानिक एका व्यासपीठावर येत आहेत.

Source: Lokmat
Dated Nov 19, 2003